## रविवार दिनांक १० नोव्हेंबर २०१९ रोजी चित्पावन संघ, गिरगाव, मुंबई येथे आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

अभ्यंकर मंडळाची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा व स्नेहसंमेलन रविवार दिनांक १० नोव्हेंबर २०१९ रोजी चित्पावन संघ, गिरगाव, मुंबई येथे संपन्न झाले. चहा, नाश्ता झाल्यावर सभेस सुरुवात झाली.

उपस्थितांचे स्वागत करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. भगवान परशुराम, श्री योगेश्वरी देवी, श्री देव व्याडेश्वर व गणपतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

तद्नंतर ज्ञात व अज्ञात दिवंगत अभ्यंकरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

श्री. पार्थ नरेंद्र अभ्यंकर, अंधेरी व श्री. विजय भास्कर अभ्यंकर, विरार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रथेप्रमाणे उपस्थितांतून डॉ. रवि अभ्यंकर यांची संमेलनाध्यक्ष म्हणून सर्वानुमाते निवड करण्यात आली. संमेलनाच्या अध्यक्षांचा परिचय करून दिल्यावर मंडळाचे अध्यक्ष श्री. निशिकांत शंकर अभ्यंकर यांनी संमेलनाध्यक्षांचे स्वागत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन केले.

संमेलनाध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली.

नोव्हेंबर २०१८ रोजी कर्जत येथे झालेल्या सभेचे इतिवृत्त तसेच २०१८-२०१९चा जमाखर्च व ताळेबंद अहवालाचे वाचन करण्यात आले. तो सर्वानुमाते मंजूर करण्यात आला.

मंडळाचे लेखापरीक्षक एस.व्ही. काळे यांनी वयपरत्वे काम करण्यास असमर्थता दर्शविल्याचे पत्र मंडळास दिले. ते सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आले तसेच त्यांनी आजपर्यंत केलेल्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल आभार मानण्यात आले.

त्यांच्या जागी विनय आचरेकर आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंट यांची सनदी लेखापाल म्हणून नियुक्ती करण्यात यावी असा ठराव मांडण्यात आला.

सूचक : श्री. लीलाधर शंकर अभ्यंकर  व अनुमोदक : श्री. अशोक विध्याधर अभ्यंकर

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

यानंतर संमेलनाध्यक्ष व मंडळाचे अध्यक्ष यांच्या हस्ते विविध सत्कार करण्यात आले.

शिक्षण, कला, क्रीडा यात उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना कै. सुधाकर कृष्णाजी उर्फ बापू अभ्यंकर यांच्या नावे मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात नैपुण्य संपादन केलेल्यांना कै. ज. द. अभ्यंकर मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

सौ. शिल्पा उदय दिक्षित व श्री. उदय विजय दिक्षित या नवदांपत्यास भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

कै. मंगलाताई गोपाळराव अभ्यंकर यांच्या नावे दिला जाणारा उद्योगश्री पुरस्कार अभ्यंकर फुटवेअर, कोल्हापुरचे श्री. गणेश अभ्यंकर व टाईपरायटींग क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या संस्थेचे संचालक श्री. अशोक अभ्यंकर, गिरगाव यांना उद्योगश्री मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तद्नंतर श्री. गणेश व श्री. अशोक यांनी एकूणच आपली वाटचाल, संघर्ष तसेच मिळविलेल्या यशाविषयी मनोगत व्यक्त केले.

तद्नंतर मंडळाला देणगी देणाऱ्या देणगीदारांचा ही सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस येणाऱ्या विषयात - आत्तापर्यंत आजीव सभासद शुल्क रू.२५०/- होते ते या सभेपासून रू.५००/- करण्यात यावे असा ठराव मांडण्यात आला.

सूचक : डॉ. संपदा लीलाधार अभ्यंकर व अनुमोदक : श्री. विजय भास्कर अभ्यंकर

वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

संमेलनाध्यक्ष डॉ. रवि अभ्यंकर यांनी आपल्या मनोगतात वैद्यकीय उपचारांचे महत्व व आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी उपयुक्त मार्गदर्शन केले.

मंडळाचे अध्यक्ष श्री. निशिकांत शंकर अभ्यंकर यांनी अध्यक्षीय भाषणात मंडळाचे कामकाज व पुढील वाटचाल या विषयी सविस्तर माहिती दिली. या नंतर श्री. विजय भास्कर अभ्यंकर यांनी आभार प्रदर्शन करून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

पुढील सत्रात प्रख्यात सतारवादक श्री. शंकर अभ्यंकर व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. कमल शंकर अभ्यंकर यांनी संगीताची- विशेषत्वाने मराठी नाट्यसंगीताची वाटचाल सांगताना अनेक किस्से, मान्यवरांच्या आठवणी सांगत दीड तासाचा अतिशय बहारदार कार्यक्रम केला. उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विशेष सांगण्याची बाब म्हणजे वय वर्षे ८० हून अधिक असलेले हे दांपत्य खास संमेलनासाठी माहिमवरून गिरगावात आले होते.

साधारण ७० च्या आसपास उपस्थित असलेल्या सभासदांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला.

तद्नंतर पहिल्यांदाच उपस्थित असलेल्या सभासदांनी आपली ओळख करून दिली. कोल्हापूरच्या श्री. गणेश अभ्यंकरांनी पुढील संमेलन कोल्हापूरला व्हावे अशी इच्छा व्यक्त केली.

चहापान झाल्यावर संमेलनाची सांगता झाली.